# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

ई-मेल: - smkcnhm@gmail.com

रजिस्ट्रेशन नं. - महाराष्ट्र/७६०/०५/सांगली दि.१५/१२/२००५

जा. क्र. /मनपा/आरोवि/राआअ/९२२/२०२४ दि. ११/ १२ /२०२४

## जाहिर सुचना

विषय: राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध कार्यक्रम/मोहिम प्रचार/प्रसिध्दीकरिता पोस्टर्स, बॅनर्स, फॉर्म व अनुशंगीक छपाई व कार्यालयीन कामकाजाकरिता विविध बुक/फॉर्म छपाई करणेबाबत...

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध कार्यक्रम/मोहिमेच्या प्रचार व प्रसिध्दीकरिता पोस्टर्स, बॅनर्स व अनुशंगीक छपाई व कार्यालयीन कामकाजाकरिता विविध बुक/फॉर्म छपाई करणेकामी मान्यता प्राप्त व इच्छुक स्थानिक पुरवठादरांकडून खालीलप्रमाणे वार्षिक खरेदी दरकरार दरपत्रक मागवणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामगिरीचा तपशील | संख्या/नग | कोटेशन दर |
|---|---|---|---|
| १ | एन.सी. डी. रजिस्टर फार्म २ A (डुप्लीकेट) Legal Size १०० पानी | प्रति नग | |
| २ | स्क्रिनिंग रजिस्टर (१०० पानी) A३ Size | प्रति नग | |
| ३ | एन.सी.डी. ट्रिटमेंट रजिस्टर (१०० पानी) A३ Size | प्रति नग | |
| ४ | Medicine Stock Book (२०० Pages A४ Size) | प्रति नग | |
| ५ | Medicine Delievery Challan Book (१०० Pages A४ Size) Duplicate | प्रति नग | |
| ६ | Medicine Indent Book (१०० Pages A४ Size) Duplicate | प्रति नग | |

यास्तव सदर तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे छपाई साहित्याचा पुरवठा करण्यास आपण इच्छूक असल्यास त्यासंदर्भातील आपले दरपत्रक दि.१८/१२/२०२४ पर्यंत कार्यालयास स्वहस्ते/ पोस्टाने कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावी. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती:**

१) दरपत्रक "Medical Officer of Health, Sangli Miraj Kupwad Municipal Corporation" यांचे नांवे सादर करावे व लखोटयावर **"राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध कार्यक्रम/मोहिम प्रचार/प्रसिध्दीकरिता पोस्टर्स, बॅनर्स, फॉर्म व अनुशंगीक छपाई व कार्यालयीन कामकाजाकरिता विविध बुक/फॉर्म छपाई दरपत्रकाबाबत"** असा उल्लेख असावा.

२) पुरवठादाराने चालू वर्षातील संस्था नोंदणी प्रमाणपत्र/शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, GST नोंदणी प्रमाणपत्र आणि पॅन कार्ड यांच्या झेरॉक्स दरपत्रकासोबत सादर कराव्यात.

३) GST नोंदणी लागू नसल्यास त्याबाबतचे सी.ए.चे प्रमाणपत्र जोडावे (टॅक्स कन्सल्टंटचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही).

४) देय्यक रक्कम मंजूर दराप्रमाणे NEFT/PFMS व्दारे अदा करणेत येईल.

५) GST दरामध्ये वाढ झाल्यास दरामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय या कार्यालयाकडे राहिल.

६) कोणतीही छपाई निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळून आल्यास ती छपाई बदलून नविन देणे बंधनकारक राहिल.

७) दरपत्रक सादर करताना स्थानिक बाजारातील पुरवठदारांचा विचार करण्यात येईल.

८) यादीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्याबाबी आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येतील.

९) मंजुर दरपत्रकाप्रमाणे मागणीनुसार वरील पुरवठा ७ दिवसाच्या आत करणे बंधनकारक आहे. वेळेत पुरवठा न झालेस आपल्या संस्थेचे नाव काळया यादीमध्ये नोंदवण्यात येईल याची नोंद घ्यावी

१०) प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

११) पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रदद करण्यात येईल आणि मंजूर पुरवठाधारकाचे नाव काळया यादीत घालणेची कारवाई केली जाईल.

१२) काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रदद करणेचा अधिकार मा. वैदयकीय आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

(डॉ. वैभव पाटील)
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
सांगली मिरज कुपवाड
महानगरपालिका